## दुष्काळ दूर करण्यासाठी व शेतक-यांना दिलासा मिळावा म्हणून राज्य शासन शेतक-यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे

## मंत्री एकनाथराव खडसे यांचे दुष्काळावरील चर्चेला उत्तर

मुंबई, दि.१४ मार्च – राज्यातील दुष्काळ, टंचाई परिस्थिती तसेच शेतक-यांच्या आत्महत्या या विषयावर आमदारांनी केलेल्या सूचना मी स्वीकारल्या आहेत. दुष्काळ दूर करण्यासाठी व शेतक-यांना दिलासा मिळावा म्हणून राज्य शासन शेतक-यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतक-यांच्या मनातील नैराश्य दूर झाले पाहिजेत, यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहोत, असे कृषि मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज विधान सभेत व विधान परिषदेत सांगितले. गेले दोन दिवस दुष्काळ या विषयावर झालेल्या चर्चे अंती ते बोलत होते.

दुष्काळ निवारणार्थ राज्य शासनाने योजलेल्या उपायांची माहिती देताना खडसे यांनी सांगितले की, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा टंचाईग्रस्त भागात व्हावा, यासाठी टँकर मंजूर करण्याचे अधिकार तहसिलदारांना देण्यात आले आहेत. तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेची उद्भवापासूनची दोन कि.मी. मर्यादा काढून पाच कि.मी. केली असून योजना मंजुरीचे एक कोटी रुपये खर्चापर्यन्तचे अधिकार जिल्हाधिका-यांना, तर रुपये पाच कोटी पर्यन्तचे अधिकार विभागीय आयुक्ताना देण्यासंबंधीचे आदेश लवकरच देण्यात येणार आहेत. ही अट तीन महिन्याकरिता शिथील करण्यात आली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी विहीरी खोल करणे, विहिरीत बोअर घेणे, विंधण विहीरी व बुडक्या मंजुरीचे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आले आहेत. पाणी नसेल अशा खेडयात दूर वरुन पाणी आणून देण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समिती व जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबरोबरच जनावरांसाठी देखील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. एक हजार लोकवस्तीच्या गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करताना २५ टक्के अधिकची रक्कम देऊन जनावरांसाठी पाणी आणण्याची मुभा देण्यात येणार असल्याचे खडसे यांनी सभागृहात सांगितले. जनावरांसाठी चारा छावण्या उघडण्यामागील गैरव्यवहार आणि गैरप्रकार टाळलेच पाहिजेत, असा शासनाचा दृष्टीकोन असून गरज असेल तेथे चारा छावण्या सुरु करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. चारा पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावा म्हणून वन खात्याची कुरणे राखीव ठेवली असून जेथे अतिरिक्त चारा आहे, तो चारा गरजेच्या ठिकाणी वाहून नेण्याचे अधिकार व निधी जिल्हाधिका-यांना देण्यात आला आहे. जनावरांसाठी चारा २४ तासात उपलब्ध व्हावा, अशी व्यवस्था केली आहे. चारा छावण्यावर राज्य शासनाने आता पर्यन्त १०९ कोटी रुपये खर्च केले आहेत.

मागेल त्याला शेततळे ही योजना सुरु केली असून तिच्या अंतर्गत ५१ हजार शेततळी आपण देणार आहोत. शेततळे मिळावे यासाठीउ आज पर्यन्त ३६,००० शेतक-यानी ऑनलाईन पध्दतीने शासनाकडे अर्ज केले आहेत. एका शेततळयासाठी राज्य शासनाने ५० हजार रुपये देणार आहे.

पीक पैसेवारी / आणेवारीची पध्दत बदलली असून तीमध्ये सुधारणा केली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास पूर्वीच्या ५० टक्क्याची मर्यादा ३३ टक्के एवढी केली आहे. वीज, आग, अपघात, सर्पदंश इत्यादी कारणांमुळे शेतक-यांचा मृत्यू झाल्यास गोपीनाथ मुंडे विमा योजने अंतर्गत दीड लाखांऐवजी चार लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचा लाभ राज्यातील एक कोटी पस्तीस लाख शेतक-यांना होणार आहे.

आज पर्यन्त टंचाई भागात शेतक-यांच्या कृषि पंपाच्या वीज देयकात ३३.५० टक्के सूट देत होतो . आता या पुढे दुष्काळी परिस्थितीत शेतक-यांने वीज वापरली नसेल तर वीज देयकात १०० टक्के सूट देण्यात येणार आहे.

शेतक-यांच्या गाई, म्हशी, गाढव, उंट, इत्यादी जनावरांचा नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू झाल्यास गाई – म्हशीसाठी प्रति जनावर ३०,००० रुपये , गाढव, उंट प्रति जनावर १५,००० रुपये, कोंबडया, बदक प्रति पक्षी ५० रुपये याप्रमाणे मदत देण्याचा निर्णय अगोदरच घेतला आहे.

दुष्काळ निवारणासाठी गेल्या १० वर्षात मिळाली नाही, एवढी आर्थिक मदत केंद्र शासनाकडून महाराष्ट्राला मिळाली. केंद्राने ३,०४९ कोटी रुपये या कामासाठी राज्याला दिले, तर, राज्य शासनाने ४,००० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पातच केली. आता पर्यन्त नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी ८,२८४ कोटी रुपये वितरीत केले आहेत. दुष्काळी परिस्थिती निवारणासाठी नापीकी रुपये २ कोटी, गारपीट रुपये ८११ कोटी, चारा रुपये १०९ कोटी, पाणी रुपये १४५ कोटी, सिंचन १,९९७ कोटी, जमीन महसूलात सूट ११४ कोटी, फी माफी ५०६ कोटी, याप्रमाणे निधी वितरीत केला आहे. शालेय परीक्षा शुल्क माफी बरोबरच टंचाईग्रस्त भागातील बारावी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांचे नियमित शुल्क देखील माफ करण्याचा आम्ही निर्णय घेणार आहोत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सर्वकष पीक विमा योजना राज्यात येत्या दिनांक १ एप्रिल २०१६ पासून लागू करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यानुसार या पीक विमा योजने अंतर्गत जिरायती, निम जिरायती आणि फळबागेसाठी अनुक्रमे शेतक-यांने एक रुपया, दोन रुपये आणि पाच रुपये विमा हप्ता भरल्यास त्याला १०० रुपयांचे विमा संरक्षण मिळणार आहे. या योजनेसाठी आम्ही दोन हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

मनरेगा अंतर्गत काम करण्यासाठी यंत्रसामुग्री वापरण्यावर बंदी आहे. तसेच दिली जाणारी १८१ रुपये मजूरी वाढवावी, अशी मागणी केली जात आहे. उद्या दिनांक १५ मार्च २०१६ रोजी मी स्वत: दिल्ली येथे केंद्र सरकार बरोबर बोलणी करणार आहे व मजूरीत वाढ करावी, अशी आग्रही मागणी करणार आहे. दुष्काळामुळे स्थलांतर रोखण्यासाठी मनरेगा अंतर्गत राज्यात ३०,६३२ कामे सुरुअसून त्यावर ४,६६,६६४ मजूर उपस्थित आहेत. गरज पडल्यास कामे तयार असावीत म्हणून ४,६२,२८७ कामे शेल्फवर आहेत. या कामांची मजूर क्षमता १,३०२.३८ कोटी एवढी आहे.

दृष्काळ इष्टापत्ती समजून राज्य शासन गंभीरपणे काम करीत आहे. बंधारे, धरणे, तलाव यामधील गाळ काढून नेताना घेतले जाणारे स्वामित्वधन १०० टक्के माफ केले आहे. एवढेच नव्हे तर गाळ वाहून नेण्यासाठी वाहनांकरिता डीझेल देखील शासन देणार आहे. दुष्काळग्रस्त १४ जिल्हयात जे.सी.बी. तसेच पोकलेन यासारखी यंत्रसामुग्री खरेदी करण्याचे

अधिकार जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांना दिले असून त्याचा उपयोग जलयुक्त शिवार योजनेसाठी करण्यात येणार आहे. याखेरीज गाळ काढण्यासाठी पाटबंधारे विभागाकडील यंत्रसामुग्री देण्याचाही निर्णय घेतला आहे. विभागातर्फे ५० कोटी रुपयांची नवी यंत्र सामुग्री खरेदी करण्यासाठी लवकरच निविदा काढण्यात येणार आहे. नाले रुंदीकरणासाठी अशी यंत्रसामुग्री वापरण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मनरेगाच्या माध्यमातून १०० टक्के अनुदानावर फळ झाड लागवड योजना राबविण्यात येणार आहे. या योजने अंतर्गत ही योजना आपल्या शेतावर बांधावर राबवू इच्छिणा-या शेतक-यांना फळझाडाची रोपे, खते तसेच कंपाऊंड बांधण्याचा खर्च राज्य शासन देणार आहे. नुकसान झालेल्या जुन्या फळबागांची पुनरउभारणी करण्यासाठी राष्ट्रीय फळबाग मिशनच्या माध्यमातून राज्याला हेक्टरी २५ हजार ते ६० हजार रुपयापर्यन्त मदत मिळण्याची अपेक्षा आहे. राज्य शासनाने नुकसानग्रस्त फळ बागेसाठी हेक्टरी १८ हजार रुपये देण्याचा निर्णय अगोदरच घेतला आहे.

राज्यातील धान, कापूस तसेच सोयाबीनचे उत्पादनात घट झाल्यामुळे आम्हालाही राज्य शासनाने मदत करावी, अशी उत्पादकांची मागणी होती. त्यानुसार ज्याना पीक विमा योजनेचा लाभ झाला नाही, त्यांनाही पीक विमा योजनेच्या ५० टक्के एवढी रक्कम मदत म्हणून देण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी १,००० कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

नापिकी, कर्जबाजारीपणा, कर्ज वसूलीचा तगादा व अन्य कारणांमुळे आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना रुपये १ लाख पर्यन्त मदत देत आहोत. मात्र, अशी मदत देताना पोलीस व महसूली अधिका-यांकडून चौकशी करुन शहनिशा केल्यानंतर अहवाल येण्यात कालापव्यय होत असे. आता याबाबत पुनर्विलोकन करण्यात येणार असून निकष शिथील करण्यात येणार आहे. शासनाने या धोरणाचे पुनर्विलोकन करुन असे ठरविले आहे की, कोणत्याही कुटुंबातील कर्त्या **शेतक-यांनी आत्महत्या केली असेल तर त्या शेतक-याच्या कुटुंबियांना कोणत्याही अटी व चौकशी शिवाय १ लाख रुपयांची आर्थिक मदत प्रचलित पध्दतीनुसार देण्यात येईल.** आत्महत्येचे कारण काय होते किंवा आत्महत्या ही शेती संकटामुळे केली आहे काय, याबाबत स्वतंत्रपणे चौकशी करण्यात येईल.

थकबाकीदार आहे म्हणून शेतक-याला कर्ज देण्यात येणार नाही, असे या पुढे होणार नाही. तर शेतकरी थकबाकीदार असला तरीही त्याला शेतीसाठी कर्ज देण्यात येणार आहे.

आगामी काळात पावसाचे प्रमाण कमी झाल्यास पाणी पुरवठयाची सोय व्हावी म्हणून जलस्त्रोत राखून ठेवण्याबरोबरच कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत. यामध्ये पिण्याच्या पाण्यास प्राधान्य द्यावयाचे असल्याने कदाचित शेतीला पाणी मिळणार नाही. पाणी काटकसरीने वापरण्याबाबतचे धोरण आम्ही त्या पूर्वीच जाहीर केले असल्याचे खडसे यांनी सभागृहात सांगितले.

***********